# ग्रामपंचायत पोहरापूर्णा येथील सपूर्ण माहिती

ग्रामपंचायत पोहरापूर्णा अंतर्गत गावातील नागरीकांनी उपलब्ध योजना १. विवाह नोंदणी २. घरकूल योजना ३. सिंचन विहिर योजना ४. गुरांचा गोठा योजना ५. सर्व शासकीय योजना आणि ग्रामपंचायत पोहरापूर्णा येथे csc सेटर वरून सर्व सेवा उपलब्ध आहे.

ग्रामपंचायत पोहरापूर्णा हे गांव अमरावती जिल्हयातील भातकूली तालूक्याातील अमरावती ते परतवाडा रोडवर अमरावती वरून ३० कि.मी. अंतरावर आहे. तर तालूक्याचे ठिकाण असलेले भातकूली या शहरापासून ३५ कि.मी अंतरावर आहे. गावाच्या बाजूला ५ कि.मी. अंतरावर असलेले पूर्णानगर हे गांव आहे येथे या गावाची बॅक ऑफ महाराष्ट हि अधिकृत बॅक आहे तसेच सेवा सहकारी सोसायटी १२९४ या मध्ये समाविष्ट आहे. जिल्हा मध्यवर्ती बॅक शाखा पूर्णानगर येथे शेतक—यांचे व्यवहार चालतात तसेच बॅक आफ महाराष्टाची मीनी बॅक आणि सि.एस.सी.सेंटर पोहरापूर्णा येथे आहे. गावातील मुख्य बाजारपेठ हि आसेगावपूर्णा आहे तसेच गावातील पोलीस स्टेशन आसेंगाव येथे आहे. गावाच्या बाजूलाच पूर्णानदी वाहत आहे

पोहरापूर्णा या गावामध्ये सर्व जाती धर्माचे लोक राहतात व समभावाचे वातावरण आहे गावाच्या सूरवातीलाच अनाथ पिंड बौध्द विहार आहे येथे अनेक पर्यटक भेट देण्याकरीता येतात हनूमान मंदीर,राम मंदीर,शिव मंदिर,अवधुत महाराज मंदीर,विठ्ठल रूख्मीनी मंदीर तसेच समाज मंदीर आहे.

पोहरापूर्णा या गावाची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनूसार ५१७ आहे. परतु त्या मध्ये आता वाढ झालेली आहे. गावातील बहूतेक कुटुंब हे शेतकरी व शेतमजूर आहे शेतामध्ये प्रामूख्याने तूर,कापूस,सोयाबीन,चना,गहू हे पारंपारीक पिके घेतली जातात शेतामध्ये सिंचनासाठी बोअरवेलचा प्रामूख्याने वापर केला जातो पोहरापूर्णा हे गांव खारपान पटयामध्ये येत असल्यामूळे बारमाही बागायत होवू शकत नाही परंतू पिकाला एक दोन पाणी देवून उत्पन्न वाढविण्यासाठी याचा वापर केला जातो.

पोहरापूर्णा गावामध्ये जिल्हा परिषद शाळेची १ ते ४ पर्यतची शाळा आहे तसेच अंगणवाडी सूध्दा आहे. गावामध्ये व्यायाम शाळा सूध्दा आहे पोहरापूर्णा येथील ग्रामपंचायत मध्ये तलाठी कार्यालय,सार्वजनिक वाचनालय ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. पोहरापूर्णा गावामध्ये दाने स्मशानभूमी सूध्दा आहे. व त्याला पोच रस्ता सूरळीत आहे.

पोहरापूर्णा हे गाव खोलापूर जि.प.सर्कल मधून स्मार्ट गांव मधून याची निवड झालेली आहे. पोहरापूर्णा गावामध्ये एक गांव एक उत्सव या प्रमाणे साजरे केले जातात गावामध्ये १. सार्वजनिक गणेशोउत्सव २. सार्वजनिक दूर्गादेवी उत्सव ३. सार्वजनिक महाशिवरात्री उत्सव ४. सार्वजनिक हनूमान जंयती उत्सव ५. सार्वजनिक कृष्ण अवधूत महाराज उत्सव ६. सार्वजनीक १४ एप्रिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव ७. सार्वजनिक ६ डिसेबर महापरिनिर्वाण दिन उत्सव अशा प्रकारे एक गांव एक उत्सव साजरे केले जातात. पोहरापूर्णा गावामध्ये अनाथ पिंड बौध्दविहारापासून ते गावापर्यत येण्याकरीता डांबरीकरणाचा पोच रस्ता सुसज्ज बनविला असून रस्त्याच्या दूतर्फा वृक्षलागवड केलेली आहे गावातील अंतर्गत रस्ते हे सिमेंट कॉक्रीट झाले असून सर्व सार्वजनिक गटारे हे बंधिस्त केलेले आहे

पोहरापूर्णा येथील सर्व कूटंब  शौच्छालयाचा वापर करतात तसेच सेप्टीटॅक शौच्छालय सर्वाकडे आहे. गावामध्ये प्रत्येक कूटूंबाला नळाद्वारे शुध्द पिण्याच्या पाण्याचा वापर केला जातो गावामध्ये गूरासाठी पिण्याच्या पाण्याचा सार्वजनिक धर्माळा बांधलेला आहे गावामध्ये ४ हॅडपंप बसविलेले आहे गावामध्ये गेल्या ३ वर्षामध्ये जवळपास १ कोटी रू. विकासकामे झालेली असून प्रत्येक कूटूंबाला कचरापेटी देण्यात आली आहे गावामध्ये घंटागाडी सूध्दा आहे पोहरापूर्णा गावामध्ये संपूर्ण गांव सि.सि.टीव्ही कॅमेराने जोडणे प्रस्तावित आहे लवकरच हे काम पूर्ण होणार आहे संपूर्ण गांवामध्ये वृक्ष लागवड ग्रा.प.मार्फत व लोकसहभागातून करण्या आली